**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे**

**द्वारा आयोजित**

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

# सन २०२३–२४

**✻ नवोपक्रम गट क्रमांक ✻**

०१

**✻ गटाचे नांव ✻**

पूर्व प्राथमिक गट

**✻ नवोपक्रमाचे शीर्षक ✻**

"पोषण भी पढाई भी"

**✻ नवोपक्रम सादरकर्ते ✻**


बबिता रोशनराज पाडवी

**✻ पद ✻**

अंगणवाडी सेविका

**✻ अंगणवाडीचे नांव व पत्ता ✻**

अंगणवाडी केंद्र डोंगरपाडा(लोय)

पो.पिंपळोद ता.जि.नंदुरबार

# नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय

| | | |
|---|---|---|
| **नवोपक्रम शिर्षक** | :- | "पोषण भी पढाई भी" |
| **नवोपक्रम सादरकर्ते** | :- | बबिता रोशनराज पाडवी |
| **पद** | :- | अंगणवाडी सेविका |
| **अंगणवाडीचे नांव** | :- | अंगणवाडी केंद्र डोंगरपाडा(लोय) ता.जि.नंदुरबार |
| **नवोपक्रम गट क्रमांक** | :- | ०१ |
| **गटाचे नांव** | :- | पूर्व प्राथमिक गट |
| **कायमचा पत्ता** | :- | मु.डोंगरपाडा(लोय) पो.पिंपळोद ता.जि.नंदुरबार |
| **शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता** | :- | एम.ए., एल.एल.बी. |
| **नोकरीचा/सेवेचा अनुभव** | :- | १० वर्ष |
| **मोबाईल नंबर** | :- | ८९७५६५८८७१/९५७९२३६३९३ |
| **ई-मेल** | :- | prachipadavi@gmail.com |
| **नवोपक्रमासाठी योजलेला कालावधी** | :- | शैक्षणिक वर्ष मार्च २०२३ ते नोव्हेंबर २०२४ व पुढेही चालुच आहे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ |
|---|---|---|
| i | मुख्यपृष्ठ | ०१ |
| ii | नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय | ०२ |
| iii | अनुक्रमणिका | ०३ |
| ०१ | नवोपक्रमाचा शिर्षक | ०४ |
| ०२ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ०५-०६ |
| ०३ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ०७ |
| ०४ | नवोपक्रमाचे नियोजन | ०८-११ |
| ०५ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १२-१७ |
| ०६ | नवोपक्रमाची फलनिष्पत्ती(उद्दिष्टानुसार) | १८ |
| ०७ | समारोप | १९ |
| ०८ | संदर्भ सूची व परिशिष्टे | २०-२१ |

# १) नवोपक्रमाचे शीर्षक :-

"पोषण भी पढाई भी"






## २) नवोपक्रमाची गरज आणि महत्व :-

अंगणवाडी सेविका या पदावर कर्तव्य बजावितांना मला ज्ञात आहे की, मागील १० वर्षांपासून अंगणवाडीच्या कामकाजात अनेक सुधारणा होत आहेत. मात्र तरी देखील अंगणवाडी केंद्र म्हणजे पोषण केंद्र अशी प्रतिमा जनमानसात रुजली आहे. पोषण हा घटक बालकांच्या सर्वांगीण विकासात व निरोगीसाठी अतिशय महत्वाचा आहे. याबाबत कोणाचेही दुमत नाही. मात्र बालकांचे अनौपचारीक शिक्षण देखील तेवढेच महत्वाचे आहे. म्हणून पोषण प्रमाणे शिक्षण व ज्ञान देणारे केंद अशी अंगणवाडीची ओळख निर्माण व्हावी यासाठी ह्या नवोपक्रमाची अत्यंत गरज आहे असे मला वाटते.

तसेच जन्माला येणारे प्रत्येक बाळ सुदृढ व निरोगी असावे व बालकांना त्यांच्या भावी आयुष्यात उपयोगी ठरेल असे पोषणविषयक शिक्षण आनंददायी पद्धतीने अंगणवाडीतच देता यावे यासाठी या उपक्रमाची भुमिका महत्वाची ठरेल.




**※ उपक्रमाचे महत्व :–**

माझे अंगणवाडी केंद्र केवळ एक पोषण केंद्रच नव्हे तर शिक्षण देणारी केंद्र बनवणे हा या नवोपक्रमाचा उद्देश आहे आणि या विषयाचे महत्व म्हणजे बालकांसाठी खुप काही वेगळे आहे. पोषण भी पढाई भी बालकांच्या आहारात बदल, वजनात बदल, शालेय शिक्षणात बदल, खेळण्यात बदल करुन आणला व पालकांना गावाचे प्रतिष्ठित नागरिक जसे सरपंच, सदस्य यांना बोलीभाषेतुन मार्गदर्शन केल्यामुळे पोषण भी पढाई भी या उपक्रमामध्ये सहभाग वाढला व सर्वांचे लक्ष वेधले गेले. या उपक्रमावर शासनाचे घरपोच आहार योजना, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आहार, चौरस आहार, शालेय शिक्षण हे या उपक्रमाचे वेगळेपण आहे.

**※ नवोपक्रमाची उपयुक्तता :–**

नवोपक्रमामुळे बालकांचा सर्वांगीण विकास होईल. ० ते ६ महिन्यांच्या बालकांना स्तनपणावर जास्त भर दिले. ६ महिने ते ६ वर्षापर्यंतच्या बालकांना कॅल्शियमयुक्त आहार, प्रोटीन युक्त आहार बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी केले.

पूर्वशालेय शिक्षणाची सवय, बडबड गीतांवर भर, गटात सहभाग, साहित्य

हाताळणे, बालकांच्या वजनात वाढ, वैयक्तिक स्वच्छता, खेळात सहभाग, गोष्टीत सहभाग, बालकांचा प्रतिसाद, पालकांचा प्रतिसाद इ. म्हणून लहान बालकांचा पोषण भी पढाई भी हा विषय दुर्लक्षित करण्याचा नाही व बालकांचे पूर्व शालेय शिक्षण, पोषण हे वेळेवर होणे फार महत्वाचे आहे आणि गावपातळीवर हा उपक्रम घेणे खुप महत्वाचे वाटू लागले व बालकांना आजच्या स्थितीला या उपक्रमाची खुप गरज आहे.

*** नवोपक्रमाचे वेगळेपण :-**

पोषण व शिक्षण हे दोन्ही वेगवेगळे घटक आहेत. परंतु दोन्ही बाबी परस्परांवर अवलंबुन आहेत. या उपक्रमात पोषण व शिक्षण यांतील समानता, पुरक बाबी शोधुन त्यांना प्रभावी करणाऱ्या कृतींची निवड करुन त्या एकाच कृतीमधुन पोषण व शिक्षण दोन्ही आनंददायी पद्धतीने मुले व पालक यांच्यापर्यंत पोहचेल असा प्रयत्न करण्यात आला आहे. पोषण विषयक कृतींमधुन शिक्षण देणे व शैक्षणिक बाबींमधुन पोषण चांगले होण्यासाठी आवश्यक ज्ञान देणे व चांगल्या सवयी लावता येणे शक्य आहे. ह्यातच या उपक्रमाचे वेगळेपण आहे.

## ३) नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

नवोपक्रमातील कृतींमधुन बालकांचा पोषण, आरोग्य व अनौपचारीक शिक्षण विषयक दर्जा सुधारणे, बालकांमध्ये आहार व आरोग्याच्या चांगल्या सवयी विकसित करणे.

१) ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांचा पोषण आहारविषयक दर्जा सुधारणे.

२) बालकांच्या वजनात वाढ होणे.

३) पूर्वशालेय शिक्षण आणि शिकण्यापासून मुलांना तयार करणे.

४) शालेय शिक्षणासाठी खेळ व खेळातुन शिकणे.

५) बोलकी भिंत मुळे अंकक्षर, आकार, पशुपक्षी, बालकांना ओळख करुन देणे.

६) बड बड गीतांची सवय होणे.

७) वैयक्तिक स्वच्छतेची सवय होणे.

८) बालकांना अंकक्षराची ओळख होणे.

९) बालकांना अंगणवाडीत येण्यासाठी गोडी वाढणे.

११)परिसराची माहिती होणे.

१२)बालकांची अंगणवाडीतील उपस्थिती वाढविणे.

१३)बालकांचा अंगणवाडीत येण्याचा प्रतिसाद वाढविणे.

१४)बालकांचा खेळात सहभाग वाढविणे.

१५)बालकांना ०१ ते १० अंक ओळख करुन देणे.

१६)स्तनदा मातांना स्तनपानाविषयी योग्य पद्धतीची माहिती नसणे.

१७)०६ महिने ते ०६ वर्षाच्या बालकांच्या आहाराविषयी माहिती नसणे.

## ४) नवोपक्रमाचे नियोजन :-

### i) उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण :-

गरोदर माता, स्तनदा माता, किशोरी मुली व इतर माता यांना पोषण व आरोग्यावर, शिक्षणावर पालकांमध्ये असे निरीक्षणात आले की, आरोग्य, पोषण, शिक्षण या विषयावर चिंतेत होत्या. गरोदर माता स्तनदा माता ० ते ६ वर्ष बालके यांचे पोषण तसेच ३ ते ६ वर्ष बालके यांना योग्य पोषण आणि शिक्षण मिळत आहे का वजनात वाढ विकास होत आहे का, मातांना कसे सक्षम बनवु बालकांना सुदृढ कसे करता येणार व शिक्षणात कसे हुशार व अंगणवाडीची गोडी कशी वाढेल, अंगणवाडीचे बालके आनंदाने कसे फुलेल म्हणून हा उपक्रम हाती घेतला पोषण भी पढाई भी.

### ii) संबंधित व्यक्तीशी चर्चा :-

परिस्थितीचे निरीक्षण केले असता उपक्रम विषयी सर्व प्रथम गावातील समुदाय आधारीत सेवानिवृत्त शिक्षक आणि स्वयंसेवक गावातील पालक गरोदर स्तनदा माता इतर माता सुपरवायझर, मा.बालविकास प्रकल्प अधिकारी, साईनाथ वंगारी साहेब, मा.जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा राठोड साहेब यांच्याशी चर्चा केली असता त्यांच्याकडून उत्तम असे मार्गदर्शन मिळाले आणि या स्थितीमध्येही माझ्या पाठीशी प्रशासन उभे राहिले आणि उपक्रम राबविण्यासाठी मला प्रोत्साहन मिळाले.

### iii) आवश्यक साधनाचा विचार :-

सर्व प्रकारची साधने हे घरगुती असल्यास काही वस्तू मी परिसरातुन मला घेता

आल्या. उदा.क्रॉस क्रेडल होल्ड मासेची पेस्ट, शेवग्याचे पानाचे पावडर, अंडी मासे, प्रोटीन युक्त आहार, शिक्षणाचे साहित्य, खेळण्याचे साहित्य इ.

**iv) करावयाच्या कृतीचा क्रम :–**

पोषण भी पढाई भी हा उपक्रम राबविणे म्हणजे खूप कठीण होते. परंतु कृतीचा क्रम लावला आणि त्या कृतीमुळे मलाही धीर मिळाला. सुरुवातीला गरोदर माता आणि स्तनदा माता यांना पोषण घटकबाबत कसे सक्षम करता येणार व बालकांना योग्य पोषक घटक कसे देता येणार व खेळातुन कसे शिक्षण घेता येणार यावर पालकांना मार्गदर्शन केले आणि त्याचा पालकांनी गरोदर माता आणि स्तनदा माता यांनी स्विकार केला.

**v) उपक्रोमोत्तर स्थितीचे निरीक्षण :–**

उपक्रम सुरु असतांना खरच गरोदर स्तनदा माता, बालके व पालक आनंदीत होते. त्यांच्या वजनातही वाढ, पोषण, शालेय पूर्वशिक्षण हे चांगले होत होते आणि मनाला खूप समाधान झाले.

**vi) कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक :–**

| अ.क्र. | कार्यवाही/उपक्रम अंतर्गत कृती | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | सरपंच, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी सी.एम.वसावे, सुपर वायझर यांच्याशी चर्चा केली. | जानेवारी २०२३ |
| ०२ | पालक सभा व माता बैठक मिटींग व तसेच ग्रामसभेमध्ये नवोपक्रमाची माहिती दिली. | जानेवारी २०२३ |
| ०३ | जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी चर्चा. | ०१ ते १५ फेब्रुवारी २०२३ |
| ०४ | सरपंच व पालकांच्या मदतीने पूर्व शालेय शिक्षणाची यादी बनविणे. | १५ ते २० फेब्रुवारी २०२३ |
| ०५ | पोषण आहाराची यादी | १५ ते २० फेब्रुवारी २०२३ |
| ०६ | अंगणवाडी बोलकी भिंत रंगरंगोटी करुन घेणे. | २१ ते २७ फेब्रुवारी २०२३ |
| ०७ | वेगवेगळ्या पदार्थ, वस्तु चे स्टॉल लावणे. | ०१ ते २० मार्च २०२३ |

| अ.क्र. | कार्यवाही/उपक्रम अंतर्गत कृती | कालावधी |
|---|---|---|
| ०८ | अंगणवाडी पोषण आहाराचे चार्ट लावणे. | ०१ ते २० मार्च २०२३ |
| ०९ | बालकांच्या वजनाचे आलेख काढले. | २१ ते २५ मार्च २०२३ |
| १० | बालकांच्या पूर्वशालेय शिक्षणाचे संच, खेळणी तयार केले. | २१ ते २५ मार्च २०२३ |
| ११ | पालक सहभागातून बालकांसाठी पोषण आहार व शिक्षणाचे साहित्य घेतले. | २५ ते २८ मार्च २०२३ |

**vii) उपक्रमांची इतरांची मदत :–**

उपक्रम राबवितांना समाजातील बालक व स्तनदा माता, इतर माता, किशोरी मुली, बाकी यांनी खूप सहकार्य केले. गावातील आहार समिती व शालेय शिक्षण समिती सी.एम.वसावे मॅडम, प्रशासकीय अधिकारी यांचा उत्कृष्ट सहभाग लाभला.

**viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :–**

उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे उपक्रम राबवित असतांना वेळोवेळी काढलेले फोटो व काही वृत्तवाहिन्यांनी माझ्या उपक्रमाची घेतलेली दखल यावेळी पुरावे म्हणून परिशिष्टामध्ये देत आहे.

लोकमत



जिल्हा प्रशासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादात मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी मनीषा खत्री. यावेळी उपस्थित मान्यवर. (छाया :सुनील कुलकर्णी)

# जिल्ह्यातील आरोग्य, शिक्षण आणि कृषी विषयांवर परिसंवादातून मंथन

## जिल्हा प्रशासनाचा उपक्रम; तिन्ही क्षेत्रातील यशस्वीतांचा गौरव

नंदुरबार : जिल्हा प्रशासन आणि 'सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस व 'लीडरशिप फॉर इक्विटी या स्वयंसेवी संस्थांतर्फे ९ मे, रोजी शैक्षणिक परिषद घेण्यात आली. परिषदेचे उदघाटन जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांनी केले. परिषदेत आरोग्य, शिक्षण आणि कृषी या क्षेत्रात जिल्ह्याने केलेले पथदर्शक प्रकल्प या विषयावर परिषदेत चर्चा करण्यात आली.

यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मिनल करनवाल, मंदार पत्की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रघुनाथ गावडे उपस्थित होते. परिषदेत अलीकडच्या काळात नंदुरबार जिल्ह्यात आरोग्य ,शिक्षण आणि कृषी क्षेत्रात राबवल्या गेलेल्या नावीन्यपूर्ण यशस्वी प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य, शिक्षण आणि कृषी या प्रत्येक विषयावर परिसंवाद पार पडले. यात नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी आरोग्यासंबंधी परिसंवादाचे अध्यक्षस्थान भूषवले. शिक्षणासंबंधी परिसंवादात डायटचे प्राचार्य जगराम भटकर यांनी मार्गदर्शन केले. कृषी विषयाशी संबंधित परिसंवादात वनमती नागपूर प्रकल्पाच्या संचालक मिताली सेठी व महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक इंदू जाखर यांनी आपले विचार व्यक्त केले. वरील तीनही क्षेत्रात उल्लेखनीय प्रकल्प राबवणाऱ्या अधिकाऱ्यांचा, शेतकऱ्यांचा, शिक्षकांचा, अंगणवाडी सेविकांचा मान्यवरांनी सन्मान केला. परिषदेत आरोग्य, शिक्षण आणि कृषी क्षेत्रात जिल्ह्याच्या पुढील वाटचालीकरिता दिशा व धोरणे ठरवण्यावर चर्चा करण्यात आली. आभार शैलेश तलवार यांनी मानले.

Hello Nandurbar
Page No. 3 May 10, 2023
Powered by: erelego.com

नंददर्शन

# लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रम



पिंपळोद (प्रतिनिधी)- नंदुरबार तालुक्यातील लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार अभियान कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी पोषण आहाराचे महत्व पटवून देण्यात आले.

नंदुरबार एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्पामार्फत राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी बालविकास सेवा योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राठोड, राजकुमार एवळे, फारुख शेख, सागर वाघ, साईनाथ वंजारी, अंगणवाडी सेविका बबीता पाडवी यांच्यासह महिला उपस्थित होत्या. यावेळी आदिवासी पारंपरीक नृत्य सादर करण्यात आले. गरोदर महिलांसाठी सकस आहार आणि भरड धान्याविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उषा राजपूत यांनी केले. भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले.

main Edition
2023-10-03 Page No. 1
Powered by : eReleGo.com

दिव्य मराठी धुळे सिटी 07-10-2023

# लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार अभियान कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



नंदुरबार | तालुक्यातील लोय येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबार अंतर्गत राष्ट्रीय पोषण आहार अभियान कार्यक्रम घेण्यात आला. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबारचे डेप्युटी सीईओ राठोड, सीडीपीओ राजकुमार ऐवळे, फारुख शेख, सागर वाघ, साईनाथ वंजारी, अंगणवाडी सेविका बबीता पाडवी उपस्थित होते. लोय येथील महिला सदरील कार्यक्रमाला उपस्थित होत्या. डेप्युटी सीईओ राठोड यांनी गरोदर महिलांसाठीचा सकस आहार, भरडधान्य याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन उषाबाई राजपूत यांनी केले.

# लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार अंतर्गत मार्गदर्शन



नंदुरबार-तालुक्यातील लोय येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबार अंतर्गत राष्ट्रीय पोषण आहार अभियान २०२३ कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबारचे डेप्युटी सीओ राठोड, सीडीपीओ. राजकुमार ऐवळे, फारुख शेख, सागर वाघ, साईनाथ वंजारी, अंगणवाडी सेविका बबीता पाडवी यादी उपस्थित होते .यावेळी लोय येथील शंभर ते सव्वाशे महिला सदरील कार्यक्रमाला उपस्थित होत्या. आलेल्या पाहुण्यांचं स्वागत आदिवासी पारंपारिक नृत्याने व वाजत गाजत करण्यात आले. यावेळी डेप्युटी सीओ राठोड यांनी गरोदर महिला साठीचा सकस आहार, भरडधान्य याविषयी माहिती दिली. यावेळी गरोदर माता च्या पालनपोषांसाठी लागणाऱ्या सकस आहार व भरड धान्याचे प्रदर्शनही ठेवण्यात आलं होतं. महिलांना प्रमाणपत्र ही वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती उषाबाई राजपूत यांनी केले. सदरील कार्यक्रमाला गावातील व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## ५) नवोपक्रमाचे कार्यपद्धती :–

### i) पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी :–

**१) वजन :–**

बालकांच्या वजनात वाढ न होणे, टिव्ही, मोबाईलवर जास्त भर देणे, मातीत खेळणे, आहार वेळवर न घेणे, दुकानातले चिवडा, कुरकुरे खाणे इ.

**२) स्वच्छता :–**

बालक अंगणवाडीत येतांना स्वच्छतेत न येणे.

**३) उपस्थिती :–**

बालकांची अंगणवाडीत उपस्थिती जास्त वेळ टिकुन न राहणे, घरी जास्त धाव घेणे.

**४) खेळात सहभाग :–**

बालक हा अंगणवाडीच्या खेळात सहभागी नसणे, सारखं रडणे, स्थिर न थांबणे, स्थिर न बसणे.

**५) बडबड गीते :–**

अंगणवाडीत बालकांकडून बडबड गीत करुन घेत असतांना किंवा कृती युक्त गाणे घेत असतांना बालकांचा सहभाग कमी असणे.

**६) ०१ ते १० अंक ओळख :–**

बालकांना अंगणवाडीत ०१ ते १० अंक अक्षर ओळख करुन दिल्यावरही त्यांना अंक अक्षर ओळख कठीण वाटणे.

**७) गोष्टीत सहभाग :–**

अंगणवाडीत बालकांना गोष्ट सांगतांना बालकांशी ऐकायची स्थिती नसायची व बसण्याची स्थिती नसायची.

**८) गटात सहभाग :–**

अंगणवाडीत बालकांना गट बनविले असतांना बालकांच्या गटामध्ये सहभाग नसायचा.

**९) साहित्य हाताळणे :–**

अंगणवाडीत जे काही खेळण्याच्या वस्तू, शिकण्याच्या वस्तूंना सुद्धा बालके हाताळायला घाबरायचे.

**१०) स्वत:ची ओळख :–**

अंगणवाडीतील बालकांना स्वत:चे नांव ही सांगता येत नव्हते, स्वत:ची ओळखही माहित नव्हती.

**११) ग्रामपंचायत भेट :–**

अंगणवाडीतल्या बालकांना ग्रामपंचायतही माहित नव्हते.

**१२) देवालय भेट :–**

अंगणवाडीतील बालकांना देवालयही माहित नव्हते.

**१३) बोलकी भिंत :–**

अंगणवाडीच्या बालकांना भिंतीवरचे अक्षर ओळख माहित नव्हती.

**१४) प्रतिसाद :–**

बालकांचा अंगणवाडी येण्यासाठी प्रतिसाद नसायचा.

**१५) गोठा भेट :–**

बालकांना गायी, म्हशींच्या गोठाही माहित नव्हता.

**१६) किराणा दुकान :–**

अंगणवाडीतील मुलांना गावातील सर्वच किराणा दुकाने माहित होती, परंतु दुकानाचे व दुकान मालकाचे नांव माहित नव्हते.


**१५) आई सक्षम नसल्यास स्तनपानाचे बाळाला होणारे नुकसान :–**

० ते ६ महिन्याच्या बालकांना दुध पाजत होती. परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे बालकांच्या वजनात व सर्वांगीण विकासात वाढ होत नव्हती.

**१६) पोषण आहार :–**

०६ महिन्याच्या बालकांना कोणते अन्न द्यावे ते बालकाच्या आईला माहित नव्हते. ती फक्त पातळ पेय किंवा पातळ पदार्थ देत होती व ०६ महिने व ०६ वर्षांच्या बालकांना कोणते आहार द्यावे ते तिला माहित नव्हते. त्यासाठी बालकांच्या आहारामध्ये दुकानाच्या पदार्थांवर ती जास्त भर देत होती. यामुळे बालकांचा सर्वांगीण विकास होत नव्हता.

## पूर्वीच्या स्थितीची निरीक्षणानुसार टक्केवारी खालीलप्रमाणे –



**ii) नंतरच्या स्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी :–**

**१) वजन :–**

बालक अंगणवाडीत येवून त्याला कॅल्शियम युक्त आहार, पोषण भी पढाई भी या उपक्रमांद्वारे मार्गदर्शन मिळाले व आजच्या स्थितीला बालकांचे वजनही वाढत आहे आणि चांगले पोषण आहारही घेत आहेत.



**२) स्वच्छता :–**

बालक अंगणवाडीत येत असतांना स्वच्छ कपडे, अंघोळ करुन, नखे काढून येतो. कोणतेही बालक अंगणवाडीत अस्वच्छतेत येत नाही.

**३) खेळात सहभाग :–**

अंगणवाडीत येणारा प्रत्येक बालक हा खेळात सहभाग घेत असतो. यामुळे उपस्थितीत वाढत आहे व कोणत्याही खेळात सहभागी होतो.

**४) बडबड गीते :–**

अंगणवाडी कोणतेही बडबड गीते, कृती युक्त गीते घेतल्यावर बालक त्याच्यात सहभागी होत असतो व आनंदाने कृती करतो व बडबड गीतांचा आनंदही घेतो यामुळे बालकांना बडबड गीतांची गोडी लागली.



**५) अंक ओळख :–**

अंगणवाडीत येणारा बालक हा खूप हुशार आहे, त्याला योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे बालकांना आता अंक अक्षर ओळखही होत आहे.



**६) गोष्टीत सहभाग :–**

अंगणवाडीत बालकांना गोष्ट सांगितल्याने बालके काल्पनिक अनुभवातुन ते वास्तविकतेचा विचार करतात आणि बालकांमध्ये एकमेकांमध्ये शेअर करतात.

**७) गटात सहभाग :–**

बालकांचे ०४ ते ०५ मुलांचे गट बनवुन गटांमध्ये बालकांचा सहभाग वाढविला. आहार खाण्याचे गट, खेळण्याचे गट, उड्या मारण्याचे गट, अंक अक्षर ओळखण्याचे गट आणि आता बालके गटानुसार पूर्वशालेय शिक्षण घेत आहेत.



**८) साहित्य हाताळणे :–**

अंगणवाडीच्या बालकांना पूर्वशालेय शिक्षणाचे संच, खेळणी, प्रत्येक बालकाला वैयक्तिक हाताळायला संधी मिळाल्याने बालके उत्साहित, आनंदीत व प्रत्येक बालक हे साहित्य हाताळत आहेत.

**९) स्वत:ची ओळख :-**

माझ्या अंगणवाडीतील बालकांना स्वत:ची ओळख करुन देत आहे व त्यांना आनंदही होत आहे. स्वत:चे नांव, आई-वडिलांचे नांव, घरातील नातेवाईक यांची नांवे सांगतांना खूप आनंद होतो. या उपक्रमामुळे बालकांना स्वत:बद्दल माहिती व आपले जवळचे नातेवाईक यांचे विषयी माहिती करुन दिल्यामुळे बालके खूप आनंदीत व बोलकी झाली, नातेसंबंधांचीही ओळख झाली.



**१०) ग्रामपंचायत भेट :-**

ग्रामपंचायत कार्यालयास भेट देवून गावातील प्रतिष्ठीत नागरिकांची ओळख करुन दिली.



**११) देवालय भेट :-**

देवालयात बालके व पुजारी यांच्यात संवाद करुन देण्यात आला. बालकांना देवालयाचे निरीक्षण करायला लावले. उदा.देवालयातील देव, उदबत्ती, दिवा, तसेच फुले-पाने इ. वस्तुंचे बालकांनी निरीक्षण केले.



**१२) बोलकी भिंत :–**

बोलक्या भिंतीमुळे बालकांबरोबरच्या दररोजच्या दैनंदिनी जीवनात शालेय शिक्षणात येणारे अंक अक्षर, आकार रंग, ओळख, दळणवळणाची साधने, पोशाख, दररोजच्या जीवनातील उपकरणे, दररोजच्या आहारातील पोषक घटक याविषयी बोलक्या भिंतीवर मांडणी करुन बालकांना बोलके केले.

**१३) गोठा भेट :–**

गोठा भेट दिली असता. सर्वप्रथम आम्ही गोठा मालकास भेटलो, गोठा मालकाचे नांव विचारले व गोठा मालकाने गोठा दाखविला. बालकांनी गोठ्याचे निरीक्षण केले. उदा.गायीने वासरुला दुध पाजण्याचे चारा, दोरी, बकऱ्या इत्यादी पाहिल्या.

**१४) किराणा दुकान :–**

किराणा दुकानाला भेट देण्यात आली. दुकानदाराशी ओळख करुन दिली. दुकानातील दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तुंची ओळख करुन दिली.

**१५) आई सक्षम असल्यास स्तनपानाचे बाळाला होणारे फायदे :–**


अंगणवाडी स्तनदा मातांना बोलावुन गृहभेट देवून मातांना क्रॉस क्रेडर होल्ड पद्धत वापरुन कसे द्यावे. यावर मार्गदर्शन करतांना आईची पूर्वतयारी करुन घेतांना सर्वप्रथम आईने आपले हात साबणाने कसे धुवावेत. बाळाला स्तनपान करवतांना माताने किती पाणी प्यावे व उकळुन थंड केलेले पाणी प्यावे. माता जेव्हा बालकाला दुध पाजेल तेव्हा तीने व्यवस्थित खुर्ची, पलंग, व्यवस्थित आधारे भेटेल असे बसण्यास सांगितले. बाळाला दिवसातुन २४ तासांत १० ते १२ वेळा स्तनपान करण्यास सांगितले व समोरासमोर निरीक्षणही केले. आईच्या दुधावर वाढणाऱ्या मुलांची बौद्धिक व मानसिक क्षमता जास्त असते व ते मला माझ्या अंगणवाडीच्या बालकांमध्ये दिसत आहे.



**१६) पोषण आहार :-**

०७ महिन्यानंतर सुरुवातीला बालकांना मऊसर आहाराने सुरुवात केली. मातांना अंडीची पेस्ट व माश्यांची पेस्ट, पौष्टिक बियांचे पावडर, काजु-बदामाची पेस्ट सुरुवात केली. तसेच ०४ मोठे चमचे दिवसातुन ०२ सकाळी आणि संध्याकाळी द्यायला लावले. आणि ते प्रात्यक्षिक त्यांच्याकडून करुन घेतले. तसेच बाळ ०७ महिन्यांचे झाले की, त्यांना अर्धी वाटी आहार दिवसातुन तीनदा देण्यास सांगितले. बाळ हे ०८ महिन्यांचे झाल्यावर हाताने उसकरलेले अन्न खायला लावले. धान्यास मळ आणले व त्यापासून पदार्थ तयार करुन दिल्यास बाळाच्या वाढीसाठी चांगले असतात. ०६ महिन्यानंतर बाळ दुधासह पुरक आहाराची सुरुवात केली. नॉर्मल बालक हा सर्वात जास्त प्रोटिन युक्त फायबर, लोह कॅल्शियम युक्त पोषक तत्वे, जीवनसत्व मिळणारे आहार सेवण केल्यास बाळं सुदृढ राहु शकते. ०६ महिने ते ०६ वर्ष बालकांचे प्रोटीन युक्त आहारावरती जास्त फोकस केला आणि बालकांच्या वजनातही वाढ होत आहे.

**नंतरच्या स्थितीचे निरीक्षणानुसार टक्केवारी खालीलप्रमाणे –**



**iii) निरीक्षण :-**

वरिल तक्त्यावरुन असे लक्षात येते की, मुलांचे शालेय पूर्वशिक्षण व पोषणावरुन उपक्रम राबविले असता खूप बदल दिसून आला.

**iv) कार्यवाही करतांना आलेल्या अडचणी:-**

१) उपक्रम राबवित असतांना वेळेची उपलब्धता खूप कमी पडली.

२) पोषण बरोबर शालेय पूर्वशिक्षणाची खूप मेहनत घ्यावी लागली.

३) वारंवार ट्रेनिंग, मिटींग असतांना खूप अडचणी आल्या.

४) पोषण आहार देणे, बालकांच्या वजनात वाढ करणे, बालकांना शालेय शिक्षणासाठी तयार करणे खूप कठीण होते.

## ६) नवोपक्रमाची यशस्विता फलनिष्पत्ती उद्दिष्टानुसार :-

२०२३-२४ या वर्षी मार्च २०२३ पासून राबविलेल्या नवोपक्रमाची फलनिष्पत्ती. पोषण भी पढाई भी या नवोपक्रमातील कृतींमधुन बालकांचा पोषण, आरोग्य व अनौपचारीक शिक्षण विषयक दर्जा सुधारला, बालकांमध्ये आहार व आरोग्याच्या चांगल्या सवयी विकसित झाल्या. अंगणवाडीतील बालकांकरीता पोषण व आनंददायी वातावरण निर्माण झाले. बालकांचा कृतीयुक्त सहभाग व शिकवण्याची जिज्ञासा वाढली.

१) ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांचा पोषण आहारविषयक दर्जा सुधारविला.

२) बालकांच्या वजनात वाढ झाली.

३) पूर्वशालेय शिक्षण आणि शिकण्यापासून मुलांना तयार केले.

४) प्रि-स्कूल मधील मुलांमध्ये शिकण्याची सवय लावली.

५) शालेय शिक्षणासाठी खेळ व खेळातुन शिकविले.

६) बोलकी भिंत मुळे अंकक्षर, आकार, पशुपक्षी, बालकांना ओळख करुन दिली.

७) बड बड गीतांची सवय लावली.

८) वैयक्तिक स्वच्छतेची सवय लावली.

९) बालकांना अंकक्षराची ओळख करुन दिली.

१०) बालकांना अंगणवाडीत येण्यासाठी गोडी वाढविली.

११) परिसराची माहिती दिली.

१२) बालकांची अंगणवाडीतील उपस्थिती वाढविली.

१३) बालकांचा अंगणवाडीत येण्याचा प्रतिसाद वाढविला.

१४) बालकांचा खेळात सहभाग वाढविला.

१५) बालकांना ०१ ते १० अंक ओळख करुन दिली.

१६) स्तनदा मातांना क्रोस क्रेडल पद्धत वापरुन बालकांना स्तनपान देण्यास मातांना सक्षम बनविले.

१७) बालकांच्या वाढीसाठी मातांना कॅल्शियम फायबर, प्रोटीन युक्त आहार खाण्याचा सल्ला दिला.

## ७) समारोप :-

० ते ६ वर्ष बालकांच्या माता, इतर माता, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी सहभाग नोंदविला. पोषण भी पढाई भी हा उपक्रम गरोदर स्तनदा माता ० ते ६ वर्ष बालके व ३ ते ६ वर्षाच्या बालकांमध्ये उपक्रम राबवितांना खूप आनंद झाला आणि ग्रामसभेमध्येही विषय मांडला व महिलांची माता बैठक मिटींग घेतली. तसेच बालकांच्या पालकांनी शालेय शिक्षणावर, पोषण आहारावर जास्त भर दिला. बालकांच्या घरी गृहभेट देवून बालकांना माता प्रात्यक्षिक काय खाऊ घालत आहेत. त्यांच्या आहारात बदल करुन दिले व मातांना प्रोटीनयुक्त आहारावर समज दिली. तसेच मातांना तिळीचे पावडर, कढीपत्याचे पावडर, भोपळ्याच्या बियांचे पावडर, शेवग्याच्या कोवळ्या पाल्याचे पावडर घरी बनविण्यास सांगितले आणि बालकांच्या आणि त्यांच्या आहारात वापरण्यास सांगितले व ते स्वत: वापरत आहे. बालकांच्या वजनातही वाढ होत आहे आणि शालेय पूर्व शिक्षणामध्येही प्रगती दिसत आहे. दर आठवड्याला बालकांचे वजनांचे व पूर्वशालेय शिक्षणाची टक्केवारी दाखविण्यात आली आणि आता बालके हसत-खेळत शालेय शिक्षण व आनंदाने फुलले आहे व बालकांचे पालक व माता तसेच प्रशासन यांनी उत्तमरित्या सहकार्य केले. त्याबद्दल सर्वांचे आभार.

## ८) नवोपक्रमासाठी संदर्भ सूची व परिशिष्टे :-

१) पोषण आहार व पूर्वशालेय शिक्षणासाठी जनजागृती.

२) ० ते ६ बालकांचे पालक सभा, माता बैठक मिटींग दर आठवड्याला मिटींग घेणे.

३) हेल्थ स्पोकन ट्युटोरियलची मदत.

४) वैयक्तिक किशोरवयीन मुली ० ते ६ वर्ष बालकांचे वजन व नोंदवही.

५) दर दिवसाला बालकांची पूर्वशालेय शिक्षणामध्ये पुननरावृत्ती करुन घेतली.

६) राष्ट्रीय पोषण माह साजरा करतांना पूर्ण कार्यक्रम हा पोषण पे चर्चा, सक्षम आई सुदृढ बालक वर घेण्यात आला व कुपोषण थांबविण्याचा संदेश या कार्यक्रमातुन दिला, कुपोषण थांबविण्याची प्रतिज्ञा घेतली व संपूर्ण गावातून जनजागृती रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत सही पोषण देश रोशन चा संदेश गावात पोहोचविले. ताज्या भाज्या, ताजे फळे, घरगुती अन्न खाण्यास योगा, लसीकरण, मोड आलेली धान्ये, अंडी, मांसाहारी पदार्थ, चिकन, दुध, दही, ताक, पनीर, लस्सी, लोणी, तुप, एक हजार दिवसांचे महत्व, स्वच्छता विषयी मार्गदर्शन केले. तसेच पोषण माहचे मुख्य उद्देश समजविण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित व्यक्ती जिल्हाधिकारी मनिषा खत्री, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रघुनाथ गावडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मिनल करनवाल, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा राठोड, बालविकास प्रकल्प अधिकारी साईनाथ वंगारी, पर्यवेक्षिका सी.एम.वसावे, पूर्ण जिल्ह्याचे अंगणवाडी सेविका आदी उपस्थित होते.

लोकमत



जिल्हा प्रशासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादात मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी मनीषा खत्री. यावेळी उपस्थित मान्यवर.
(छाया :सुनील कुलकर्णी)

## जिल्ह्यातील आरोग्य, शिक्षण आणि कृषी विषयांवर परिसंवादातून मंथन

### जिल्हा प्रशासनाचा उपक्रम; तिन्ही क्षेत्रातील यशस्वीतांचा गौरव

नंदुरबार : जिल्हा प्रशासन आणि 'सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस व 'लीडरशिप फॉर इक्विटी या स्वयंसेवी संस्थांतर्फे १ मे, रोजी शैक्षणिक परिषद घेण्यात आली. परिषदेचे उदघाटन जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांनी केले. परिषदेत आरोग्य, शिक्षण आणि कृषी या क्षेत्रात जिल्ह्याने केलेले पथदर्शक प्रकल्प या विषयावर परिषदेत चर्चा करण्यात आली.

यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मिनल करनवाल, मंदार पत्की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रघुनाथ गावडे उपस्थित होते. परिषदेत अलीकडच्या काळात नंदुरबार जिल्ह्यात आरोग्य ,शिक्षण आणि कृषी क्षेत्रात राबवल्या गेलेल्या नावीन्यपूर्ण यशस्वी प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य, शिक्षण आणि कृषी या प्रत्येक विषयावर परिसंवाद पार पडले. यात नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी आरोग्यासंबंधी परिसंवादाचे अध्यक्षस्थान भूषवले. शिक्षणासंबंधी परिसंवादात डायटचे प्राचार्य जगराम भटकर यांनी मार्गदर्शन केले. कृषी विषयाशी संबंधित परिसंवादात वनमती नागपूर प्रकल्पाच्या संचालक मिताली सेठी व महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक इंदू जाखर यांनी आपले विचार व्यक्त केले. वरील तीनही क्षेत्रात उल्लेखनीय प्रकल्प राबवणाऱ्या अधिकाऱ्यांचा, शेतकऱ्यांचा, शिक्षकांचा, अंगणवाडी सेविकांचा मान्यवरांनी सन्मान केला. परिषदेत आरोग्य, शिक्षण आणि कृषी क्षेत्रात जिल्ह्याच्या पुढील वाटचालीकरिता दिशा व धोरणे ठरवण्यावर चर्चा करण्यात आली. आभार शैलेश तलवार यांनी मानले.

Hello Nandurbar
Page No. 3 May 10, 2023
Powered by: erelego.com

दिव्य मराठी धुळे सिटी 07-10-2023

## लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार अभियान कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



नंदुरबार | तालुक्यातील लोय येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबार अंतर्गत राष्ट्रीय पोषण आहार अभियान कार्यक्रम घेण्यात आला. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबारचे डेप्युटी सीईओ राठोड, सीडीपीओ राजकुमार ऐवळे, फारुख शेख, सागर वाघ, साईनाथ वंजारी, अंगणवाडी सेविका बबीता पाडवी उपस्थित होते. लोय येथील महिला सदरील कार्यक्रमाला उपस्थित होत्या. डेप्युटी सीईओ राठोड यांनी गरोदर महिलांसाठीचा सकस आहार, भरडधान्य याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन उषाबाई राजपूत यांनी केले.

# नंदुदर्शन

# लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रम




पिंपळोद (प्रतिनिधी)- नंदुरबार तालुक्यातील लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार अभियान कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी पोषण आहाराचे महत्व पटवून देण्यात आले.

नंदुरबार एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्पामार्फत राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी बालविकास सेवा योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राठोड, राजकुमार एवळे, फारुख शेख, सागर वाघ, साईनाथ वंजारी, अंगणवाडी सेविका बबीता पाडवी यांच्यासह महिला उपस्थित होत्या. यावेळी आदिवासी पारंपरीक नृत्य सादर करण्यात आले. गरोदर महिलांसाठी सकस आहार आणि भरड धान्याविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उषा राजपूत यांनी केले. भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# लोय येथे राष्ट्रीय पोषण आहार अंतर्गत मार्गदर्शन



नंदुरबार-तालुक्यातील लोय येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबार अंतर्गत राष्ट्रीय पोषण आहार अभियान २०२३ कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नंदुरबारचे डेप्युटी सीओ राठोड, सीडीपीओ. राजकुमार ऐवळे, फारुख शेख, सागर वाघ, साईनाथ वंजारी, अंगणवाडी सेविका बबीता पाडवी यादी उपस्थित होते .यावेळी लोय येथील शंभर ते सव्वाशे महिला सदरील कार्यक्रमाला उपस्थित होत्या. आलेल्या पाहुण्यांचं स्वागत आदिवासी पारंपारिक नृत्याने व वाजत गाजत करण्यात आले. यावेळी डेप्युटी सीओ राठोड यांनी गरोदर महिला साठीचा सकस आहार, भरडधान्य याविषयी माहिती दिली. यावेळी गरोदर माता च्या पालनपोषांसाठी लागणाऱ्या सकस आहार व भरड धान्याचे प्रदर्शनही ठेवण्यात आलं होतं. महिलांना प्रमाणपत्र ही वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती उषाबाई राजपूत यांनी केले. सदरील कार्यक्रमाला गावातील व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

